नों. शा./सा. बा. वि.
आज प्राप्त झाले
दि. 05 JUL 2014

मा. उच्च न्यायालय, मुंबई तसेच नागपूर व औरंगाबाद येथील खंडपीठे यांच्यासमोर दाखल झालेल्या न्यायालयीन प्रकरणांमध्ये त्वरीत कार्यवाही होणेबाबत

महाराष्ट्र शासन
विधि व न्याय विभाग
शासन परिपत्रक क्रमांक : संकीर्ण-२८१४/प्र.क्र.७८/१४/का.८
मादामा कामा मार्ग, राजगुरु चौक
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक :२७ जून, २०१४.

सा. बां. वि., मंत्रालय
दिनांक 05 JUL 2014

वाचा : शासन परिपत्रक क्रमांक ५/VIP/E, दिनांक ३० मार्च, २०१०.

परिपत्रक

मा. उच्च न्यायालय, मुंबई तसेच नागपूर व औरंगाबाद येथील खंडपीठे यांच्यासमोर महाराष्ट्र शासन व शासकीय अधिकारी यांचे विरुध्द दाखल झालेल्या न्यायालयीन प्रकरणांमध्ये परिच्छेदनिहाय अभिप्राय तसेच शासनस्तरावरील निदेश / सूचना वेळेवर दिल्या जात नाहीत, अशी सर्व सरकारी वकीलांकडून मा. मुख्य सचिव यांचेकडे तक्रार आली आहे. मा. उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने देखील याची दखल घेतली असून तीव्र नापसंती दर्शविली आहे. तसेच यापुढे सरकारी वकीलांनी संबंधित विभागाच्या सूचनांच्याअभावी प्रकरण तहकुबीची मागणी केल्यास फक्त पहिल्यावेळेस पुढील तारीख देण्यात येईल व त्यानंतर प्रत्येक तहकुबीसाठी शासनाकडून खर्च (COST) वसुल केला जाईल, अशी मा. उच्च न्यायालयाने सक्त ताकीद दिली आहे. सदर बाब गंभीर आहे. सरकारी वकीलांच्या दि. २१.६.२०१४ च्या पत्राची प्रत यासोबत माहितीसाठी जोडली आहे.

२. वस्तुत: यापूर्वी वारंवार दिलेल्या सूचनांनुसार संबंधित अधिकाऱ्यांनी न्यायालयीन प्रकरणाच्या सुनावणीपूर्वी सरकारी वकीलांशी सल्लामसलत करुन प्रतिज्ञापत्र दाखल करणे तसेच प्रत्येक सुनावणीस कागदपत्रांसह उपस्थित राहाणे आवश्यक आहे. ही बाब यापूर्वीच्या परिपत्रकामध्ये वेळोवेळी सूचीत करण्यात आली आहे. तसेच प्रत्येक विभागाने नियुक्त केलेल्या नोडल अधिकाऱ्यांमार्फत तत्परतेने कार्यवाही होणे व त्यांनी स्वत: किंवा संबंधित अधिकारी यांनी मा. न्यायालयात हजर राहणे बंधनकारक असल्याने प्रत्येक विभाग

प्रमुखाने याची दक्षता घेणे उचित ठरेल, अन्यथा मा. न्यायालयाकडून प्रत्येक प्रकरणी तहकूबीच्या विनंतीसाठी ठोठावण्यात येणाऱ्या खर्चाची रक्कम देण्याची जबाबदारी विभाग प्रमुखाची राहील याची नोंद घ्यावी.

३. वरील विषयासंदर्भात असेही लक्षात आले आहे की, पूर्वी विभागाने नेमलेले नोडल अधिकारी सध्या त्या त्या विभागात कार्यरत नाहीत. सबब, त्यांच्या जागी अन्य नोडल अधिकाऱ्यांची तात्काळ नेमणूक करुन त्यांचा वैयक्तिक तपशील ( मोबाईल क्रमांकासह ) सरकारी वकीलांचे कार्यालय तसेच विधि व न्याय विभागास कळविणे आवश्यक आहे.

४. उपरोक्त मार्गदर्शक सूचनांचे पालन न झाल्यास त्याची गंभीर दखल घेतली जाईल.

५. सदर परिपत्रक प्रशासकीय विभागांनी त्यांच्या नियंत्रणाखालील अधिकारी / कार्यालयाच्या निदर्शनास आणावे.

महाराष्ट्र राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( ज. स. सहारिया )
शासनाचे मुख्य सचिव

प्रति,

मुख्य सचिवांचे कार्यालय,

सर्व मंत्रालयीन विभाग,

सह सचिव, विधि व न्याय विभाग, मुंबई / नागपूर /औरंगाबाद

9

# OFFICE OF THE GOVERNMENT PLEADER, WRIT CELL,
## HIGH COURT, A.S. MUMBAI.

Ground Floor, Room No.4, P.W.D. Bldg High Court, Fort, Mumbai.

Off. Tel. No. 26677694 Fax No. 22673093.

MOST URGENT NO. SKS/GP/

COURT MATTER Date : 21st June 2014

BY FAX / HAND DELIVERY

To,

The Principal Secretary and
Remembrancer of Legal Affairs,
Law and Judiciary Department,
Mantralaya, Mumbai.

SUB : Delay in response from the various Departments of the State to the letters written by Additional Govt. Pleaders and Assistant Government Pleaders seeking parawise remarks / instructions in the Writ Petitions proceedings.

Mrs. Nate D
D.S. to coordinate & submit immediately.
Spl PS at
21/06/14

Sir,

It may be stated that despite writing letters to the Department concerned, which is impleaded as Respondent in the Petition, seldom response is received in time. The Government Lawyers, in the circumstances, has to plead and request for time. It is the experience of all Government Lawyers. The result is, the matters are adjourned from time to time.

On 19th June, 2014, the Division Bench of Mr. Justice A.S. Oka and Mr. Justice A.S. Chandurkar has called upon me to resolve this issue. It is the experience of other Benches also. The Division Bench has now

indicated that if the response is not received in time, it may accommodate the State once, but may impose cost for next adjournment.

It is unpleasant situation causing embarrassment to the Government Lawyers. You are, therefore, requested to bring this fact to the notice of the Chief Secretary, State of Maharashtra. Though, the Nodal Officers are appointed by each of the Departments, the mechanism is not working well at all, and as seen, there is no improvement in the scenario. Thus, in my view, it is high time to seriously look into this issue, in as much as, in all the Writ Petitions, the State is contesting party.

You are, therefore, requested to take appropriate steps and be pleased to inform the undersigned. The Division Bench of Mr. Justice A.S. Oka and Mr. Justice A.S. Chandurkar has directed me to address the Court on this issue on 25th June, 2014. I am aware that the time span, at your level for the resolving this issue, is very short, but nevertheless, some steps are required to be taken in this regard.

Thanking you,

Yours Sincerely,

Sandeep Shinde

(Sandeep K. Shinde)
Govt. Pleader, Writ Cell,
High Court, A.S., Mumbai